संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना/ ग्रामस्थांना सवलतीच्या दराने बायोगॅस/स्वयंपाक गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबाबतची योजना योजनांची त्रयस्त तपासणी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक - एफडीएम-२०१२/प्र.क्र.४/फ-२ .
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ०३ एप्रिल,२०१३.

वाचा :-
१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एफडीएम-२०१२/प्र.क्र.४/फ-२, दि.१०.०७.२०१२
२) महसूल व वन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. एफडीएम-२०१२/प्र.क्र.४/फ-२, दि.०८.०१.२०१३
३) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र. एफडीएम-२०११/प्र.क्र.१००/फ-२, दि.१८.०१.२०१३
४) महसूल व वन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. एफडीएम-२०१२/प्र.क्र.४/फ-२, दि.२६.०२.२०१३

**शासन परिपत्रक :-**

वनक्षेत्रावरील जळाऊ लाकडाच्या तोडीमुळे वनावर होणारे दुष्परिणाम कमी होण्यासाठी तसेच वृक्षलागवडीचे संरक्षण होण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून वनालगतच्या गावातील आदिवासी तसेच अनुसूचित जातीच्या आणि बिगर मागास वर्गीय लोकांना लाभ होण्याच्या दृष्टीकोनातून संदर्भ क्र. १ वरील दि.१०.०७.२०१२ च्या शासन निर्णयान्वये सवलतीच्या दराने बायोगॅस/स्वयंपाक गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षणाकरिता प्रोत्साहन देण्याबाबतची योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती च्या लाभार्थ्यांची निवड करताना दक्षता घेण्यासंदर्भातील सूचना संदर्भ क्र.२ वरील दि.०८.०१.२०१३ व संदर्भ क्र.४ वरील दि.२६.०२.२०१३ च्या शासन शुध्दीपत्रकांन्वये देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या कामाच्या अनुषंगाने तसेच समितीच्या सदस्यांना/ ग्रामस्थांना दि.१०.०७.२०१२ च्या शासन निर्णयान्वये राबवावयाच्या योजनेबाबतचा आढावा घेण्यासंदर्भात संदर्भ क्र.३ वरील दि.१८.०१.२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. दि.१०.०७.२०१२ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी उपयोजना व अनुसूचित जाती उपयोजना याखाली संयुक्त व्यवस्थापन समितीमध्ये देण्यात येणारे स्वयंपाक गॅस, बायोगॅस आणि दुभती जनावरे यांच्या पूरवठयासंदर्भातील राबवावयाच्या योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होण्याच्या दृष्टीने तपासणीकरिता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१. प्रत्येक वनक्षेत्रपालाच्या क्षेत्रात वाटप करण्यात आलेल्या स्वयंपाक गॅस, बायोगॅस आणि दुभती जनावरे यांची १० टक्के तपासणी करुन, लाभार्थ्यांचे डिजीटल फोटो घेण्यात यावेत. याबाबतीत मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन) यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कर्मचारी वर्गाला यामध्ये सहभागी करुन घ्यावे.

२. उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांनी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात वितरीत केलेले स्वयंपाक गॅस, बायोगॅस आणि दुभती जनावरे यांची गावनिहाय यादी तयार करुन मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (मुल्यांकन) यांचेकडे दि. १५ एप्रिल, २०१३ पर्यंत गावनिहाय देतील. वितरीत केलेल्या यादींची १० टक्के तपासणी मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (मुल्यांकन) हे कार्यक्रम तयार करुन तपासणी दि. ३० मे, २०१३ पर्यंत पूर्ण करतील. जे उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी वितरीत केलेले स्वयंपाक गॅस, बायोगॅस आणि दुभती जनावरे यांची गावनिहाय यादी मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (मुल्यांकन) यांचेकडे दि. १५ एप्रिल, २०१३ पर्यंत देणार नाहीत, त्यांचेबाबतीत दिनांक १६ एप्रिल,२०१३ रोजीच शिस्तभंगाची कार्यवाही मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी प्रस्तावित करावी.

३. मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (मुल्यांकन) हे तपासणी करीत असतांना, खालील पाहणी करतील.

(१) गावाची निवड करताना संयुक्त वन व्यवस्थापन समितीमध्ये लागवड केलेल्या जिवंत वृक्षांची टक्केवारी ६० टक्क्यांपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.

(२) गावांनी चराईबंदी, कुऱ्हाडबंदीची अंमलबजावणी केलेली आहे.

(३) गावात आगीचे प्रमाण कमी असून, त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना केलेली आहे, अशांची तपासणी करावी.

(४) ज्या लाभार्थ्यांना सदरहू योजनेचा फायदा झालेला आहे, त्यांचा संयुक्त ग्रामसभेचा ठराव आहे किंवा कसे, याची तपासणी करावी.

(५) ग्रामसभेचा ठराव घेतल्यानंतर हा निधी संयुक्त व्यवस्थापन समितीच्या खात्यांमध्ये जमा करुन तो वितरीत केला आहे किंवा सामग्री विकत घेण्याकरिता लाभार्थ्यांना दिला आहे, याबाबतीत तपासणी करावी.

(६) ज्या लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा झालेला आहे, त्यासंदर्भातील साहित्य (स्वयंपाक गॅस, बायोगॅस यासंदर्भात सिलेंडर) लाभार्थ्यांकडे उपलब्ध आहे का ? हे तपासून लाभार्थ्यांकडे असलेल्या साहित्याचे लाभार्थ्यांसह फोटो घ्यावेत.

(७) लाभार्थ्यांच्या गावांत अनुसूचित जमाती उप योजना किंवा अनुसूचित जाती उप योजना यांचेमधून अनुदानाचा लाभ दिला असल्यास ते लाभार्थी अनुक्रमे अनुसूचित जमाती वा अनुसूचित जाती मधील आहे का याची तपासणी करावी.

४. मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (मुल्यांकन) यांनी वरील प्रमाणे केलेल्या तपासणीचा अहवाल दि.१५.०६.२०१३ पर्यंत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( प्रवीण परदेशी )
प्रधान सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

०१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
०२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)/(उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
०३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास)/(कार्मिक), म.रा.नागपूर.
०४) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
०५) सर्व मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक/उप वनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) /(वन्यजीव)/ (कार्यआयोजना)/ (मुल्यांकन)
०६) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.
०७) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
०८) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
०९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१०) वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन मंत्रालय, मुंबई.
११) नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई
१२) मा.मंत्री (वने)/मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१३) मा.मंत्री (आदिवासी विकास)/मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
१४) मा.मंत्री (सामाजिक न्याय)/मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
१५) आदिवासी विकास विभाग/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१६) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) निवडनस्ती , फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२